# कलम 4 (1) (ब) (vii)

## पिं.चिं.म.न.पा. येथील नागरी सुविधा केंद्र कार्यालयाच्या परिनामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था

| अनु.क्र. | सल्ला मसलीतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियमा / नियमा / परिपत्रकाद्वारे | पुनरावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| 1 | महानगरपालिका लोकशाही दिन | नागरीकांच्या समस्या त्वरित निवारण होण्यासाठी मनपा लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी स. 10 ते 12 या वेळेत आयोजित केला जातो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील कोणत्याही नागरीकास समस्या निर्माण झाल्यास त्याची पुर्तता करणे तसेच अधिकारी व कर्मचारी यांसमवेत नागरीकांचा कार्यप्रणालीमध्ये समावेश करून घेणे या उद्देशाने महापालिका जनहित लक्षात घेवून लोकाशाही दिन राबवित असून जे नागरीक या संधीचा फायदा घेवू शकत नाहीत अशांसाठी मध्यवर्ती तक्रार निवारण कक्ष सुरू करून संगणकाच्या माध्यमाने तक्रारी स्विकृत करून त्या समस्यांची पुर्तता प्राधान्याने करण्याबाबत पाठपुरावा केला जातो. | शासनाने जाहीर केलेल्या महानगरपालिका लोकशाही दिन याबाबतचे परिपत्रक क्रं. महालो-1007/292/प्र.क्र.53/07/18अ दि. 7/11/07 च्या अनुषंगाने आणि शासन निर्णय क्रमांक प्रसुधा/2011/प्र.क्र.189/11/18 अ दिनांक 26/9/2012 | दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी स. 10 ते दु. 12.00 पर्यंत |

| अनु.क्र. | सल्ला मसलीतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम / नियम / परिपत्रकाद्वारे | पुनरावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| 2 | माहिती अधिकार 2005 | केंद्र शासनाने जाहीर केलेल्या कायद्यानुसार ज्या नागरीकांना / संस्थेला अथवा कोणासही माहिती घ्यावयाची असेल तर विहीत नमुन्यातील अर्ज व त्यावर र.रू.10/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावून आवश्यक ती माहिती मागविता येते. असा अर्ज प्राप्त झाल्यावर | केंद्र शासनाने जाहीर केलेला माहिती अधिकार 2005 व वेळोवेळी निर्गमित होण्या-या अद्यादेशान्वये | --------- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | तो संबंधित विभागाकडे ठराविक कालावधी देवून कार्यवाहीसाठी पाठविला जातो. पुर्ण कार्यवाही झाल्यावर संबंधित विभागाकडे प्राप्त झालेली माहिती योग्य आहे अथवा नाही याची खातरजमा माहिती अधिकारी करून संबंधित अर्जदाराला देणेत येते. या उपरही ज्या अर्जदारास माहिती बाबत साशंकता निर्माण झालेली असेल तो अर्जदार अपिलीय अधिका-यांकडे र.रू. 20/- कोर्ट फी स्टॅम्प लावून पुन्हा अपिल करू शकतो. अशा प्रसंगी अपिलीय अधिकारी सुनावणी घेवून त्यावर निर्णय देतात. | | |